# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

दूरध्वनी / फॅक्स : २५६५६२३४, E-Mail : ropune@dtemaharashtra.gov.in; Website : www.ropune.org.in

जा.क्र.विकापु/आस्था-४/गणवेश/२०१९/ 5316 दिनांक : 19 DEC 2019

प्रति,
संचालक/प्राचार्य,
सर्व शासकीय संस्था/कार्यालये
पुणे विभाग

**विषय :- कार्यालयीन वेळेत गणवेश परिधान केला नसल्याने चतुर्थश्रेणी कर्मचारी व वाहनचालकांवर करण्यात आलेल्या शिस्तभंगाची कार्यवाहीबाबतची माहिती देणेबाबत.**

**संदर्भ :- संचालनालयाचे पत्र क्र. १६/आस्था/गणवेश/२०१९/३५०, दिनांक ११/१२/२०१९**

राज्य शासकीय चतुर्थश्रेणी कर्मचारी यांना दर दोन वर्षांनी ३ गणवेशाकरीता कापड, शिलाई भत्ता व वेतनामध्ये दरमहा धुलाई भत्ता देण्यात येतो. तसेच वाहनचालक यांनाही दर दोन वर्षांनी गणवेश भत्ता व दरमहा वेतनामध्ये भत्ता देण्यात येतो.

संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय संस्था/कार्यालयातील चतुर्थश्रेणी कर्मचारी व वाहनचालक कार्यालयीन वेळेत गणवेश परिधान करीत नसल्यास, त्यांचेविरुद्ध शासन निर्णय दिनांक ३१/०८/२००२ व दिनांक २८/१२/२००६ मधील तरतुदीनुसार आपल्या स्तरावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली असल्यास, केलेल्या कारवाईबाबतची माहिती या कार्यालयास **दिनांक २१/१२/२०१९ पर्यंत** तात्काळ सादर करण्यात यावी. जेणेकरुन सदरची माहिती संचालनालयास विहीत मुदतीत सादर करणे शक्य होईल. तथापि उपरोक्त प्रकरणी कोणत्याही चतुर्थश्रेणी/वाहनचालक कर्मचा-यावर शिस्तभंगाची कारवाई केली नसल्यास माहिती निरंक असलेबाबत कळविण्यात यावे.

**सोबत वरीलप्रमाणे**

(डॉ. दि. रा.नंदनवार)
प्र. सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६१०६०१, २२६१०६०२,२२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail :- desk16.dte@gmail.com Internet :- http/www.dte.org.in


क्र.१६/आस्था/गणवेष/२०१९/3५0
दिनांक: 11 DEC 2019

प्रति,

१) सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर.

२) सचिव,
महाराष्ट्र राज्य, तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई.

विषय: कार्यालयीन वेळेत गणवेष परिधान केला नसल्याने चतुर्थश्रेणी कर्मचारी व वाहन चालकांवर करण्यात आलेल्या शिस्तभंगाची कार्यवाहीबाबतची माहिती देणेबाबत...

संदर्भ: सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. गणवेष -३६१८/प्र.क्र. २०७/२९, दिनांक २० नोव्हेंबर, २०१९.

उपरोक्त विषयास अनुसरुन शासनाच्या संदर्भीय पत्रान्वये या संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व संस्थाना कळविण्यांत येते की, राज्य शासकीय चतुर्थश्रेणी आणि वाहन चालक यांना सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक १२.१०.१९९४ अन्वये गणवेष विहित करण्यात आला असून सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक २६.३.२००८ अन्वये शिलाई भत्ता देण्यात येतो.

त्या अनुषांगने राज्य शासकीय चतुर्थश्रेणी कर्मचारी यांना दर दोन वर्षानी ३ गणवेषाकरीता कापड, शिलाई भत्ता व वेतनामध्ये दरमहा धुलाई भत्ता देण्यात येतो. तसेच वाहन चालक यांनाही दर दोन वर्षानी गणवेष भत्ता व दरमहा वेतनामध्ये भत्ता देण्यात येतो.

संचालनालयातील तसेच संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व संस्थेमधील चतुर्थश्रेणी व वाहन चालक गणवेष परिधान करीत असल्याचे निदर्शनास येत नाहित. तरी शासन निर्णय दिनांक ३१.८.२००२ व दिनाक २८.१२.२००६ मधील तरदतूदीनुसार कार्यालयीन वेळेत गणवेष परिधान केला नसल्याने किंती चतुर्थश्रेणी व वाहन चालक यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई आपल्या स्तरावर करण्यात आली असल्यास केलेल्या शिस्तभंगाची कारवाईबाबतची माहिती या संचालनालयास तात्काळ पाठविण्यात यावा, जेणेकरुन सदरील माहिती विहीत मुदतीत शासनास सादर करण्यास सुलभ होईल.

सोबत- वरील प्रमाणे


तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
2019
92400


(प्रमोद नाईक)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,

१) मा.सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (आस्था/२) यांना माहितीकरीता सादर.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
१९ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.
दूरध्वनी क्र. ०२२-२२८८१८९२ Email:lalit.sadafule@nic.in

गणवेष-३६१८/प्र.क्र.२०७/२९ दिनांक: ३० नोव्हेंबर, २०१९.

प्रति,

अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२,

**विषय :- कार्यालयीन वेळेत गणवेष परिधान केला नसल्याने चतुर्थश्रेणी कर्मचारी व वाहन चालकांवर करण्यात आलेल्या शिस्तभंगाची कारवाईबाबतची माहिती देणेबाबत.**

महोदय / महोदया,

राज्य शासकीय चतुर्थश्रेणी कर्मचारी आणि वाहन चालक यांना सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि.१२.१०.१९९४ अन्वये गणवेष विहित करण्यात आला असून सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि.२६.०३.२००८ अन्वये शिलाई भत्ता देण्यात येत आहे.

त्याअनुषंगाने राज्य शासकीय चतुर्थश्रेणी कर्मचारी यांना दर दोन वर्षांनी २ गणवेषाकरीता कापड, शिलाई भत्ता व वेतनामध्ये दरमहा धुलाई भत्ता देण्यात येते. तसेच वाहन चालक यांनाही दर दोन वर्षांनी गणवेष भत्ता व दरमहा वेतनामध्ये धुलाई भत्ता देण्यात येतो.

तथापि, मंत्रालयीन स्तरावर चतुर्थश्रेणी कर्मचारी व वाहन चालक गणवेष परिधान करीत असल्याचे निदर्शनास येत नाहीत. तरी शासन निर्णय दि.३१.०८.२००२ व दि.२८.१२.२००६ मधील तरतूदीनुसार कार्यालयीन वेळेत गणवेष परिधान केला नसल्याने किती चतुर्थश्रेणी कर्मचारी व वाहन चालक यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली आहे, याबाबतची आपल्या प्रशासकीय विभाग (खुद्द) व आपल्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रिय कार्यालयाकडील माहिती लवकरात लवकर उपलब्ध करुन देण्यात यावी, ही विनंती.

आपला,

सोबत :- वर उल्लेखित शासन
निर्णयांच्या प्रती.

( ल. जि. वळवी )
उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग

प्रत :- माहितीसाठी अग्रेषित.
सचिव (प्र.सु., र.व.का.) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२.

[illegible]